ePaper
|वर्ष - 6 | अंक - 134 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com |रविवार | दिनांक 21 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# लोकसभा निवडणुकीत मोदी-केजरीवाल अशीच लढत!; सिसोदिया यांचा दावा



## आतील पानांत


- गोविंदा आरक्षणावरून उद्वेग; स्पर्धा परीक्षार्थीचा तीव्र विरोध
- भोसरीसह समाविष्ट गावांमध्ये दहीहंडी उत्साहात!
- गणेशोत्सव करमुक्त झाला


### प्रशासक राजवटीत 'प्रशासनाला' कामाचा आवाका येईना?

# प्रेक्षागृह कंत्राटीकरणाचा घाट!

## साफसफाई ठेकेदाराला 4 महिने मुदतवाढ

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिरी-चिंचवड महापालिकेच्या प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाचा खर्च मोठ्या प्रमाणात होत असल्याने हे प्रेक्षागृह स्वायत्त संस्थेला भाडेतत्वावर चालविण्यास देण्याचा घाट घातला जात आहे. त्यासाठी प्रक्रीयाही चालू करण्यात आली आहे. त्यामुळे प्रेक्षागृहाच्या इमारतीमधील कॉरीडॉर आणि अंतर्गत व बाह्य परिसराची दैनंदीन साफसफाई आणि स्वच्छता करणाऱ्या ठेकेदाराला पुन्हा चार महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येणार आहे. त्यासाठी १५ लाख ६० हजार रूपये खर्च होणार आहे. महापालिकेचे चिंचवड येथे प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह आहे. प्रेक्षागृहाच्या इमारतीचा कॉरिडॉर अणि अंतर्गत व बाह्य परिसराची दैनंदीन साफसफाई आणि स्वच्छता खासगीकरणाद्वारे यांत्रिक पद्धतीने तसेच मनुष्यबळाद्वारे करण्यात येते. या कामासाठी राजमाता अहिल्यादेवी होळकर स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी या कामासाठी ६७ लाख ५० हजार रूपये दर सादर केला. हा दर अर्थसंकल्पीय दर ८४ लाख ७ हजार रूपयांपेक्षा १९.७० टक्के कमी



असल्याने स्विकृत करण्यात आला. तसेच त्यांची दोन वर्षे कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली. या कामाची मुदत ३० एप्रिल २०२२ रोजी संपुष्टात आली आहे. या कामाची नव्याने निविदा प्रक्रीया कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली. मात्र, या कामाच्या नविन निविदेसाठी होणारा खर्च जास्त आहे. खर्च जास्त असल्याने प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह हे स्वायत्त संस्थेला भाडेतत्वावर चालविण्यात देणार आहे. त्यामुळे या कामाची निविदा कार्यवाही थांबविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

### चार महिन्यांची साफसफाई; साडे पंधरा लाखांचा खर्च

प्रेक्षागृह स्वायत्त संस्थेला भाडेतत्वावर चालविण्यास देण्याच्या कामाची प्रक्रिया चालू करण्यात आली आहे. त्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे या प्रेक्षागृहामध्ये नागरिकांचे व राजकीय लोकांचे कायम कार्यक्रम पार पडत असतात. तेथील नागरिकांना व राजकीय लोकांना स्वच्छतेबाबत कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी प्रेक्षागृहाची दैनंदीन साफसफाई होणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कार्यरत असणाऱ्या राजमाता अहिल्यादेवी होळकर स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्थेकडूनच साफसफाईचे काम करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी प्रेक्षागृहाच्या इमारतीमधील कॉरीडॉर आणि अंतर्गत व बाह्य परिसराची दैनंदीन साफसफाई करण्याच्या कामास चार महिने मुदतवाढ देण्यात येणार आहे. त्यासाठी १५ लाख ६० हजार रूपये खर्च होणार आहे.

---

### बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांची चौकशी करा

# नियमबाह्य काम करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना 'रेड कार्पेट'

## चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनची चौकशी समिती नेमण्याची मागणी

**पिंपरी चिंचवड।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी चिंचवड शहरातील नियमबाह्य गृहप्रकल्प उभारलेल्या बांधकाम व्यवसायिकांना पिंपरी चिंचवड महापालिकेतील बांधकाम विभागातील अधिकारी 'रेड कार्पेट' आंथरत असल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे. यातून शहराला बकालपणा येत असून शहर नियोजन देखील गुंडाळले जात आहे. मात्र याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला जातो. या प्रकारांकडे गांभीर्याने लक्ष देऊन अशा अधिकाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी अशी मागणी नवनियुक्त आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे करण्यात आली आहे.

चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनने ही मागणी केली आहे. फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी याबाबत माहिती दिली. ते म्हणाले, पिंपरी चिंचवड शहरातील अनेक बांधकाम व्यावसायिकानी बांधकाम परवान्यामधील अटी व शर्तीचे उल्लंघन केलेले आहे, पूर्वीच्या मंजूर बांधकाम प्लॅन मध्ये सोसायटी धारकांच्या संमतीशिवाय बदल (प्लॅन रिवाइज) केलेले आहेत.



गृहप्रकल्प पूर्ण झाल्यावर त्याला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देताना आपल्या बांधकाम विभागाने बिल्डरने नियमाप्रमाणे बांधकाम केलेले आहे का ? सर्व अटी शर्ती पाळल्या आहेत का ? याची पहाणी न करता अशा गृहप्रकल्पाना बांधकाम पूर्णत्वाचे दाखले दिलेले आहेत. बऱ्याच बांधकाम व्यावसायिक यांनी नियमानुसार बांधकाम केलेले नाही, बांधकाम परवान्यामधील अटींचे उल्लंघन केलेले आहे. तसेच ग्राहकांच्या अग्रीमेंटमध्ये लिहून देऊन देखील त्या गोष्टी केलेल्या नाहीत. भामाआसखेड प्रकल्पाचे काम पूर्ण होई पर्यंत बिल्डर स्वतः स्वखर्चाने पाणी पुरवले या पिंपरी चिंचवड मनपाने लिहून घेतलेल्या हमीपत्राप्रमाणे सोसायटीधारकांना पाणी न पुरवून हमी पत्राचे उलंघन केलेले आहे.

अशा सर्व गोष्टींची आपण चौकशी करावी. पूर्वीचे आयुक्त तसेच पिंपरी चिंचवड मनपाच्या बांधकाम परवाना विभागाचे कार्यकारी अभियंता तसेच शहर अभियंता यांच्याकडे फेडरेशनकडे लिखित तक्रारी केलेल्या आहेत. तरीदेखील अशा बिल्डरला पाठीशी घालून याची काहीही चौकशी न करता या सर्व बांधकाम व्यावसायिकांना पाठीशी घालून कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या सर्व तक्रारीची आपण चौकशी समिती नेमून चोकशी करावी. आणि आम्हा सोसायटी धारकांना न्याय मिळवून द्यावा असे सांगळे यांनी म्हंटले आहे.

# गोविंदा आरक्षणावरून उद्वेग; स्पर्धा परीक्षार्थींचा तीव्र विरोध

## पाच टक्क्यांत आधीच 61 क्रीडा प्रकारांचा समावेश

**पुणे ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुणे : राज्य सरकारने गोविंदांना 'खेळाडू आरक्षणा'चा लाभ देण्याचा निर्णय घेतला असला, तरी या खेळाला संघटनात्मक स्वरूप दिल्याशिवाय आणि नियम निश्चितीविना हा लाभ देता येणार नसल्याचे स्पष्ट आहे. दुसरीकडे या घोषणेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत असून स्पर्धा परीक्षार्थींनी आंदोलनाबरोबरच न्यायालयीन लढाई लढण्याचाही इशारा दिला आहे.

उच्च गुणवत्तेच्या खेळाडूंसाठी शासकीय आणि निमशासकीय सेवेत पाच टक्के आरक्षणाची तरतूद आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत तिरंदाजी, ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, टेबल टेनिस, खो खो, कुस्ती, कबड्डी आदी खेळांसह एकूण ६१ खेळ त्यासाठी पात्र आहेत. मात्र राज्य सरकारने गोविंदांना खेळाडू आरक्षणाचा लाभ देण्याची घोषणा विधानसभेत केल्यानंतर स्पर्धा परीक्षार्थिनी या निर्णयाविरोधात भूमिका घेतली आहे. खेळाडू असल्याचे बनावट प्रमाणपत्र सादर केल्याचे प्रकार उघडकीला येत असताना राज्य सरकारच्या या निर्णयामुळे वर्षांनुवर्षे अभ्यास करणाऱ्या उमेदवारांवर अन्याय होईल, असा स्पर्धा परीक्षार्थींचा आक्षेप आहे. केवळ पक्षाच्या कार्यकर्त्यांना खूश करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षार्थींनी आता अभ्यास सोडून दहीहंडी स्पर्धेत सहभाग घ्यायचा का, असा प्रश्न विद्यार्थी उपस्थित करीत आहेत.



### समाजमाध्यमांतून उडवली जातेय खिल्ली

गोविंदांना खेळाडू आरक्षणाचा लाभ देण्याच्या निर्णयाची समाजमाध्यमांतून खिल्ली उडवण्यात येत आहे. निर्णयाची टर उडवणारी मिम्स, 'स्पर्धा परीक्षेच्या फेऱ्यात अडकण्यापेक्षा पाच टक्क्यांत नोकरीसाठी सरळ दहीहंडीला लटकावे' असे संदेश समाजमाध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात फिरत आहेत.

### संघटनात्मक स्वरूप आवश्यक

खेळाडू आरक्षणाचा लाभ देण्यासाठी संबंधित खेळाला राज्य पातळीवरील संस्था, जिल्हा पातळीवरील संस्था असे संघटनात्मक स्वरूप असणे आवश्यक आहे. संघटनेने खेळाचे नियम जाहीर करून स्पर्धांचे आयोजन करावे लागते. त्यामुळे आता गोविंदांना खेळाडू आरक्षणाचा लाभ देण्यासाठी संघटना स्थापन करणे, खेळाचे नियम निश्चित करणे, वयाचे निकष, वेगवेगळ्या स्तरावरील स्पर्धांचे आयोजन आदी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल, असे युवक आणि क्रीडा संचालनालयाचे आयुक्त ओमप्रकाश बकोरिया यांनी स्पष्ट केले.

### 'नियम, निकष निश्चितीची गरज'

मानवी मनोरे उभारण्यासाठी धाडस लागते. त्यासाठी सराव करावा लागतो, सुदृढता असावी लागते. त्यामुळे 'मानवी मनोरे' हा साहसी क्रीडा प्रकार आहे, असे सर्वांचे मत झाले. मात्र आता अन्य खेळांनुसार जिल्हा संघटना, राज्य संघटना स्थापन करावी लागेल. या खेळाचे नियम, निकष निश्चित करावे लागतील. खेळाडूंच्या सुरक्षिततेचाही प्राधान्याने विचार करावा लागेल, असे ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांनी सांगितले.

### साहसी खेळाचा निर्णय 2016 मध्येच..

मानवी मनोरे उभारण्याच्या प्रकाराला (खेळाला) साहसी क्रीडा प्रकाराचा दर्जा देण्याबाबतचा शासन निर्णय २०१६मध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता. या खेळाच्या आयोजनाबाबत विस्तृत नियमावली राज्य संघटनेने प्राधान्याने तयार करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र आतापर्यंत क्रीडा विभागाकडे एकाही संघटनेची नोंद नसल्याचे

# पिंपरी चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार

## नवनियुक्त महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचे प्रतिपादन

**पुणे ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन शहरातील पायाभूत सुविधांची निर्मिती आणि संरचनात्मक आखणी करून शहराच्या नावलौकिकात वाढ करण्यासाठी भर दिला जाणार असून वेगाने वाढणाऱ्या पिंपरी चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आयुक्त शेखर सिंह यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्त पदाचा पदभार शेखर सिंह यांनी स्वीकारला. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते.



पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामध्ये पदभार स्विकारण्याची प्रक्रिया पार पडली. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, उल्हास जगताप यांनी नवनियुक्त आयुक्त शेखर सिंह यांचे स्वागत केले. यावेळी सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

२०१२ च्या आयएएस बॅचच्या महाराष्ट्र केडरचे अधिकारी असणारे शेखर सिंह एम.एस. स्ट्रक्चर इंजिनियर आहेत. २०१२ मध्ये परिविक्षाधीन कालावधीमध्ये त्यांनी रामटेक नागपूर येथून प्रशासकीय सेवेला सुरुवात केली. त्यानंतर सहायक जिल्हाधिकारी म्हणून ते ऑगस्ट २०१३ पासून नागपूर येथे कार्यरत होते. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी जून २०१५ पासून काम करण्यास सुरुवात केली. जानेवारी २०१८ मध्ये ते गडचिरोलीचे जिल्हाधिकारी म्हणून काम केले. तर जानेवारी २०२० पासून ते सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. आज त्यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला.

प्रारंभी, आयुक्त शेखर सिंह यांनी सर्व विभागप्रमुखांशी औपचारिक संवाद साधत परिचय करून घेतला. प्रामाणिकपणा, कामाप्रती एकनिष्ठता आणि कर्तव्यनिष्ठता महत्वाची असून अधिकाऱ्यांनी नागरिकांशी सौजन्याने वागत आपली सेवा बजवावी अशी सूचना देखील त्यांनी अधिकाऱ्यांना दिली.

### राज्यभरातील गोविंदा पथकांचा उत्फूर्त सहभाग

# भोसरीसह समाविष्ट गावांमध्ये दहीहंडी उत्साहात!

## आमदार महेश लांडगे यांची ठिकठिकाणी भेट



**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**कोविड काळात दोन वर्षे दहीहंडी उत्सव सार्वजनिकपणे साजरा करता आला नाही. मात्र, यावर्षी भोसरीसह समाविष्ट गावांत दहीहंडी उत्सव दिमाखात साजरा करण्यात आला. भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी शहरातील सर्वच दहीहंडी उत्सवांना उपस्थिती दर्शवली. सेलिब्रेटी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत यंदाचा उत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला. दहीहंडी उत्सवानिमित्त भोसरी आणि परिसरातील मंडळांचा लौकीक आहे. भैरवनाथ कबड्डी संघाने भोसरी पी.एम.टी चौकात मानाची दहीहंडी उभारण्यात आली. यावर्षी अपंगत्व किंवा अपघातात शरीराचा भाग गमावलेल्या नागरिकांसाठी कृत्रिम अवयव देण्यात आले. या दहीहंडी उत्सवासाठी 'महाराष्ट्राची हास्य जत्रा फेम'अभिनेत्री प्राजक्ता माळी, सेलिब्रेटी अँकर दिप्ती हालवाई यांचे प्रमुख आकर्षण होते. युवा नेते योगेश लांडगे आणि सहकाऱ्यांनी नियोजन केले होते. अष्टविनायक मंडळ, चाकण गोविंदा पथकाने दहीहंडी फोडली. मुंबई, पुणे, बारामती आदी भागातील गोविंदा पथके उत्सवात सहभागी झाले.**



### मंचरमध्येही आमदार लांडगे समर्थकांचा उत्साह...

भोसरीसह पिंपरी-चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातही आमदार महेश लांडगे यांच्या समर्थकांनी ठिकठिकाणी दहीहंडी उत्सव साजरा केला. मंचर येथील पै. महेशदादा लांडगे स्पोर्ट्स फाउंडेशनआणि लोकमान्य प्रतिष्ठानतर्फे १ लाख ११ हजार १११ रुपयांच्या दहीहंडीचे आयोजन करण्यात आले. तसेच, प्रत्येक सलामी देणाऱ्या पथकास ११ हजार १११ रुपये रोख आणि आकर्षक ट्रॉफी देण्यात आली.

### शहरातील पहिली महिला सार्वजनिक दहीहंडी...

पिंपरी-चिंचवड शहरातील पहिली महिला सार्वजनिक दहीहंडी उत्सव श्री. वसंतनाना लोंढे प्रतिष्ठानतर्फे आयोजित करण्यात आली. 'स्वराज्य रक्षक संभाजी'फेम अभिनेत्री अश्विनी महांगडे या उत्सवाच्या प्रमुख आकर्षण होत्या. ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांचे पारितोषिक असलेल्या या दहीहंडीचे संयोजन न्यू होम मिनिस्टर खेळ रंगला पैठणीचा कार्यक्रमातून क्रांतीनाना मळेकर यांनी केले. बाल शिवराज महिला गोविंदा पथक, मुंबई गोविंदा पथकाने ही मानाची दहीहंडी फोडली. रणरागिणी शिवकालीन युद्ध कला पथकाने गोविंदा आणि प्रेक्षकांचा उत्साह वाढवला.

चिखली येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे यांच्या पुढाकाराने आणि शिवरक्त प्रतिष्ठानतर्फे घरकूल येथील मेन सर्कल येथे दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख आकर्षक 'बीग बॉस'व 'माझ्या नवऱ्याची बायको फेम'मीरा जगन्नाथ हीने उपस्थिती दर्शवली. चेंबूर- मुंबई येथील रिद्धी-सिद्धी गोविंदा पथकाने दहीहंडी फोडली. त्यांना ५ लाख ५५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.

भाजपा महिला मोर्चाच्या शहर उपाध्यक्षा सोनम जांभूळकर- जाधव यांच्या पुढाकाराने वुड्सव्हिले फेज-२, चिखली येथे उत्सव आयोजित केला आहे. यावेळी प्रमुख आकर्षण म्हणून सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि अक्षया देवधर उपस्थित राहणार आहेत.

माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे आणि नागेश्वर महाराज दहीहंडी महोत्सवचे अध्यक्ष गणेश सस्ते यांच्या पुढाकाराने मोशी येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौकात दहीहंडी उत्सव झाला. जय गणेश युवा फाउंडेशनतर्फे आयोजन करण्यात आले. यावेळी 'हाउसफूल-२' फेम शाझहान पदमसी, 'स्वराज्य रक्षक संभाजी'फेम प्राजक्ता गायकवाड, 'मन उडू उडू झालं'फेम रीना मधुकर, 'मुरंबा'फेम आरुष बाणखेले यांनी बाळ-गोपाळ आणि प्रेक्षकांचा उत्साह वाढवला. जित्राई माता मित्र मंडळ, चाकण गोविंदा पथकाने दहीहंडी फोडण्याचा मान मिळवला. दिघी गावठाण येथे डोळस मैदानावर माजी नगरसेवक विकास डोळस, संजय गायकवाड आणि कुलदीप परांडे यांच्या पुढाकाराने अखिल दिघीगाव दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र सौंदर्य सम्राज्ञी अमृता गोसावी आणि 'धर्मवीर'आणि 'मुळशी



पॅटर्न'फेम क्षितीज दाते यांची प्रमुख आकर्षण म्हणून उपस्थित होती. चाकण येथील माऊली गोविंदा पथकाने दहीहंडी फोडण्याचा मान मिळवला. जाधववाडी-

चिखली येथील रामायण मैदानावर श्री. संतोषतात्या जाधव युवा मंचतर्फे आणि माजी नगरसेविका अश्विनी जाधव यांच्या पुढाकाराने दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी 'खुलता कळी खुलेना'फेम ओमप्रकाश शिंदे, 'स्वराज्य रक्षक संभाजी' फेम अश्विनी महांगडे, सिने अभिनेते भगवान पाचोरे, 'सुख म्हणजे नक्की काय असते'फेम माधवी निमकर, रिल्स स्टार पै. अभि गायकवाड यांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

### छावा प्रतिष्ठानची दिमाखदार दहीहंडी...

**पिंपरी-चिंचवडमधील पहिली सार्वजनिक दहीहंडी भरवणाऱ्या छावा प्रतिष्ठानतर्फे यावर्षीसुद्धा दिमाखदार उत्सव साजरा केला. माजी नगरसेवक आणि छावा प्रतिष्ठानचे अध्यक्ष जालिंदर शिंदे यांनी या उत्सवाचे आयोजन केले. भगवान गव्हाणे चौक, पी.सी.एम.टी. चौक, भोसरी येथे झालेल्या या उत्सवाला मोठ्याप्रमाणात गर्दी झाली होती. आमदार महेश लांडगे आणि जालिंदर शिंदे दोघांनीही डीजेच्या तालावर ठेका धरला. दादा आणि बापू एकत्र आल्यावर 'जाळ अन् धूर एकत्रच निघतो' अशी उस्फुर्त भावना यावेळी आमदार लांडगे यांनी व्यक्त केली. तसेच, भोसरी आणि 'आपले लाडके आमदार'असा उल्लेख करीत जालिंदर शिंदे यांनी त्याला दाद दिली. 'केजीएफ' फेम अभिनेता गुरूडा, 'कारभारी लयभारी'फेम अनुष्का सरकाटे, निखील चव्हाण, 'शॉर्टकट'फेम संस्कृती बालगुडे, 'गडबड गोंधळ'फेम स्मिता गोंदकर आणि 'टाईमपास-३'फेम कृतीका गायकवाड उपस्थित होते.**

## संपादकीय »

# कसले सबलीकरण... हे तर अबलीकरण..

***"महिलांना अपमानित करण्याच्या संस्कृतीचा आपण त्याग करण्याची शपथ घ्यायला हवी", असा उदात्त सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देऊन काही तास व्हायच्या आत गुजरात सरकारने बिल्किस बानोवर बलात्कार करून तिच्या अवघ्या तीन वर्षांच्या मुलीसह १४ जणांचा जीव घेणाऱ्या ११ जणांस जन्मठेपेच्या शिक्षेतून माफी देत त्यांची सुटका केली. असे करून गुजरात सरकारने आपल्याच सर्वोच्च नेत्यास तर तोंडघशी पाडलेच पण त्याचबरोबर समस्त महिला वर्गाचीही अपमान केला, असे म्हणायला हवे.***

या गुन्ह्याचे गांभीर्य ज्यांस माहीत असेल, स्मरत असेल आणि एकंदरच सामाजिक सभ्यतेवर ज्यांचा (अजूनही) विश्वास असेल ते सर्व गुजरात सरकारच्या या निर्णयाने सुन्न झाले असतील. हा सर्वसाधारण गुन्हा नव्हता. दोन दशकांपूर्वीच्या गुजरात दंगलीत १०-११ जणांच्या जमावाने गुजरातच्या दाहोड जिल्ह्यातील लिमखेडा शहरात बिल्किसची कोणत्याही महिलेची कधीही होऊ नये अशी विटंबना केली. एक स्त्री या नात्याने हे दुःख कमी पडले म्हणून की काय आई म्हणूनही तीस उद्ध्वस्त केले. तिच्या डोळ्यादेखत सालेह या तिच्या तीन वर्षांच्या लेकीला जमिनीवर आपटून मारले आणि नंतर या जमावाने बिल्किसच्या कुटुंबातील व अन्य १४ जणांना ठार केले. आज वयाच्या चाळिशीत असलेली बिल्किस २० वर्षांपूर्वीच्या या भयानक घटनांच्या जखमा सांभाळत आयुष्यात स्थिरावण्याचा प्रयत्न करत होती. आपल्यावर इतके नृशंस अत्याचार करणाऱ्यांना सरकारने मोकाट सोडल्याचे पाहून आज बिल्किस पुन्हा हलली आहे. खरे तर जे झाले त्यामुळे समस्त समाजालाच हादरे बसायला हवेत. पण या अभागी महिलेचे 'बिल्किस बानो' असणे हा सामाजिक संवेदना जागृत होण्यातील महत्त्वाचा अडथळा नसेलच याची खात्री नाही. वेदनांच्या मोजमापनासही धर्मपट्टी लावण्याच्या आजच्या काळात बिल्किसच्या दुःखावर काही विशिष्टांकडून(च) सहवेदनेची फुंकर घातली गेली वा नाही तर त्यात आश्चर्य नाही.

या वास्तवातही आपली सदसद्विवेकबुद्धी शाबूत असणाऱ्यांसाठी या प्रकरणाचा आढावा आवश्यक ठरतो. तो घ्यायचा याचे कारण ज्या सर्वोच्च न्यायालयामुळे हे प्रकरण त्या वेळी धसास लागले, ज्या सर्वोच्च न्यायालयामुळे या प्रकरणाची सुनावणी गुजरातमधून मुंबईत हलवली गेली, त्याच सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडच्या निकालामुळे हे सर्व आरोपी तुरुंगातून सुटू शकले. यात लक्षात घ्यायला हवी अशी आणखी एक बाब म्हणजे त्याच सर्वोच्च न्यायालयामुळे हे प्रकरण धसास लावणाऱ्या तिस्ता सेटलवाड आता तुरुंगात आहेत. आरोप सिद्ध झालेले गुन्हेगार मोकाट आणि त्यांच्यावरील आरोप सिद्ध व्हावेत यासाठी प्रयत्न करणारे सरकारी अधिकारी, कार्यकर्ते तुरुंगात असे हे आजचे वास्तव.



## आनंदी सकाळ

### 'भिऊ नकोस मी पाठीशी आहे!'

श्री विष्णू बळवंत थोरातांनी रचलेल्या श्री स्वामी चरित्र सारामृतात श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अवताराची पार्श्वभूमी प्रथम अध्यायात विशद केली आहे. त्यानुसार पापाचार वाढला, मोठ्या संख्येने धर्मभ्रष्ट मनमानी करू लागले. वैभवहीनता, गरिबी, दुःखे वाढली. धर्मबंधने शिथिल झाली. वेदवचनांवरचा विश्वास उडू लागला. नास्तिकता वाढली. होमहवनादी पुण्यकर्म अत्यल्प होत गेली. धर्माचा राजाश्रय संपला. विविध विद्या व कला लोप पावू लागल्या. ऐहिक भोगेच्छा बळावल्या. परमार्थाचा जगण्याशी संबंध उरला नाही. अशा प्रतिकूल पतनकाळात भगवान श्री स्वामी समर्थ महाराज अक्कलकोटेला अवतरले. यतिराज स्वामी समर्थांचे वैराग्य भगवान शिवासारखे, तेज प्रखर सूर्यासारखे, भक्तांसाठी वात्सल्य मातेप्रमाणे व दुष्ट-उन्मत्तांसाठी कठोर शासन. भगवान श्री स्वामी समर्थ अनादिसिद्ध, दीनबंधु-दुःखितांना परमआधार, एकमेव, नित्य द्वंद्वातीत, भावातीत विमल, अचल, त्रैलोक्यपालक, परमेश्वराचे अनुभवगम्य सद्गुरू रूप आहे.



## भूमिका

# सुसह्य सहलखोरीसाठी..

सरकारी सुट्टीच्या दुसऱ्या शनिवार-रविवारला जोडून आलेला स्वातंत्र्य दिन, त्याला लागून पारसी नववर्ष दिनाच्या मंगळवारनंतर भाकड बुधवार ढकलला की कृष्णजन्माष्टमीच्या पाठीवरून येणाऱ्या गोपाळकाल्यास पुढे करून पुन्हा येणारे शनिवार-रविवार म्हणजे घरकोंबड्यांनाही घराबाहेर पडायला लावेल असा हा दुर्मीळ योग. एकाच आठवड्यात इतक्या सुट्ट्या ठासून भरलेल्या आढळणे अगदीच दुर्मीळ. त्यात हा स्वातंत्र्याचा अमृतकाल आणि वर करोनाची सरत चाललेली भीती. म्हणजे तर पाहायलाच नको. तेव्हा या अशा देवदुर्लभ अमृतकाळातील वातावरणीय अमृत प्राशन करण्याच्या मिषाने माणसांच्या मनातील सहलखोरीच्या भावना उचंबळून आल्या नसत्या तरच नवल. त्यासाठी त्यांस बोल लावता येणार नाही. तथापि



पावसाळ्यात पाऊस पडणे अपेक्षित असले तरी अतिवृष्टी झाल्यास ज्याप्रमाणे पाण्याचा निचरा होत नाही त्याप्रमाणे सद्यःस्थितीत या सुट्टीखोरांच्या उत्साहाचाही निचरा होताना दिसत नाही. त्यामुळे हे समग्र सहलखोर आणि त्यांच्या सुट्टीच्या भावना शहरांत ठिकठिकाणी साचून राहिल्याचे आढळून येते. मानवी मनातील या सहलखोरीचा सामाजिक आविष्कार ही सहजप्रवृत्ती मानली तरी प्रश्न असा की तीस सामोरे जाण्यासाठी सरकारी यंत्रणा सज्ज आहेत का? त्यांच्यात त्याबाबत संवेदनशीलता जागृती झालेली आहे का? तसे काही प्रयत्न झाले का?

या आणि अशा साऱ्या प्रश्नांचे कारण म्हणजे गेले दोन-तीन दिवस अनेक शहरांतून समोर येत असलेले चित्र. त्यात अनैसर्गिक वा ओंगळवाणे काही नाही हे खरे. पण इतक्या महाप्रचंड प्रमाणावर जनसमुदाय जेव्हा घराबाहेर पडतो आणि तो तसा पडणार हे आधीच स्पष्ट असते तेव्हा उद्भवणारी परिस्थिती हाताळण्याचे नियोजनच आपल्याकडे दिसत नाही, ही यातील चिंतेची बाब. यातून अधिक चिंता वाढेल अशी आणखी एक बाब समोर येते. ती म्हणजे पायाभूत सोयीसुविधांची कमालीची मर्यादा. ही आता उत्तरोत्तर अधिकाधिक उसवत जाईल. या आठवड्यातच येणारी जन्माष्टमी, महिनाअखेरीस सुरू होत असलेला गणेशोत्सव, तो संपल्यानंतर जेमतेम पंधरवड्याच्या उसंतीनंतर येणाऱ्या नवरात्रीतील गरबा वगैरे आहेच. या संपूर्ण काळात आपल्या शहरांतील जगणे कमालीचे खडतर होऊन जाते. त्यास यंदा अधिक प्रकर्षाने जाणवणारी रस्त्यांची भीषण अवस्था. ती आज इतकी वाईट आहे याचा अर्थ कालच्या सरकारने त्यासाठी पुरेसे काम केलेले नाही हे मान्य करायला हवे. राज्याची राजधानी ही देशाची आर्थिक राजधानीदेखील आहे. पण ते म्हणायला. प्रत्यक्षात या शहरातील रस्ते ग्रामपंचायतीच्या दर्जाचेच. त्यात कधीही न संपणारी विविध कामे. ती पूर्ण झाल्यावर परिस्थिती सुधारेल अशा आशेने दिवस काढण्याचीही सोय नाही. कारण ही कामे संपतात. पण दुसरी कोणती सुरू होतात. यावर उपाय म्हणून, 'एकदा मेट्रो सुरू झाली की सर्व काही सुरळीत होईल' असे फक्त चिरंतन आशावादीच म्हणू आणि मानू शकतात. मुंबईत ज्या मार्गावर मेट्रो धावते त्या मार्गाखालील रस्त्यावरही तुडुंब वाहनगर्दी असते.

# आनंदचे वारसदार!


**'चेन्नईतले बुद्धिबळ ऑलिम्पियाड आजवर झालेल्यांपैकी सर्वाधिक सुनियोजित म्हटले पाहिजे', अशी सार्वत्रिक प्रतिक्रिया या स्पर्धेसाठी आलेले बहुतांश पाहुणे मायदेशी पोहोचल्यानंतर व्यक्त करतात, ही आपल्यासाठी समाधानकारक आणि अभिमानास्पद बाब.**

चेन्नईपासून काही अंतरावर असलेल्या मामल्लापुरम येथे ही स्पर्धा प्रत्यक्ष खेळवली गेली. त्यासाठी जगभरातून १८६ देशांचे १७०० खेळाडू, प्रशिक्षक, सहायक भारतात आले होते. ऑलिम्पियाड स्पर्धेचे आयोजन हे बहुविध खेळांच्या स्पर्धेप्रमाणेच आव्हानात्मक समजले जाते, कारण नियोजनाचा भार सहसा एका शहराच्या आणि राज्याच्या प्रशासनाला उचलावा लागतो. त्या आघाडीवर तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि त्यांच्या प्रशासनाची कामगिरी खणखणीत होती. स्टॅलिन सरकारमधील अत्यंत वरिष्ठ नोकरशहा संयोजनकार्यासाठी तैनात होते. स्थानिक प्रशासन, कॉर्पोरेट विश्व, असंख्य प्रशिक्षित कार्यकर्ते असा फौजफाटा ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी निगुतीने राबला. माजी जगज्जेता आणि महान बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद हा तमिळनाडू किंवा चेन्नईचा आहे या वास्तवापाशी आत्मसंतुष्ट न राहता, त्याच्या देदीप्यमान कारकीर्दीला शोभेसे संयोजन चेन्नईने करून दाखवले. इतर



सर्व शहरांसाठी आणि राज्य सरकारांसाठी त्यामुळेच हे ऑलिम्पियाड आदर्शवत ठरावे. या ऑलिम्पियाडची आणखी एक गंमत म्हणजे, मुळात ते चेन्नईत होणारच नव्हते. २०२० मध्ये ते रशियात होणार होते. त्या वेळी करोनामुळे ते लांबणीवर पडले आणि यंदाच्या वर्षी युक्रेनवर रशियाने हल्ला केल्यामुळे त्या देशाकडून यजमानपदच काढून घेण्यात आले. ऐन वेळी यजमानपद कोणाला द्यायचे याचे उत्तर भारतीय बुद्धिबळ संघटनेचे सचिव भारतसिंह चौहान यांनी दिले. ही स्पर्धा भारतात भरवून दाखवण्याचे आश्वासन त्यांनी दिले. भारतातून दिल्ली, गुजरात आणि तमिळनाडू या राज्यांनी रस दाखवला. त्यातही तमिळनाडूने १०० कोटी रुपयांची हमी तातडीने देऊन आणि असा तसा निधी तत्परतेने उभा करून बाजी मारली. हल्लीच क्रीडा प्रकल्प आणि स्पर्धांमध्ये नवोन्मेषी रुची निर्माण झालेल्या गुजरात राज्याने ही स्पर्धा भरवण्यासाठी जोर लावला होता. परंतु स्पर्धा भरवण्याचा अनुभव आणि पायाभूत सुविधा उभारण्यातली तत्परता या जोरावर तमिळनाडूने बाजी मारली. खेळाडूंच्या कामगिरीकडे वळण्यापूर्वी ही प्रस्तावना आवश्यक, कारण खेळातील यश हे निव्वळ खेळाडूंचे असत नाही. या स्पर्धेपूर्वी भारतात झालेली अशी बहुराष्ट्रीय स्पर्धा म्हणजे दिल्ली राष्ट्रकुल २०१०. त्याही स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी करून दाखवलीच होती. मात्र आजही ती स्पर्धा खेळाडूंच्या कामगिरीसाठी नव्हे, तर सुरेश कलमाडी प्रभृतींच्या घोटाळ्यांसाठीच कुपरिचित आहे. चेन्नई ऑलिम्पियाडच्या बाबतीत हे होणार नाही. किंबहुना, भारतीय बुद्धिबळपटूंच्या कामगिरीइतकीच ती उत्तम संयोजनासाठीही स्मरणात राहील. आता थोडेसे पटावरील भारतीयांच्या कामगिरीविषयी.

## ।। अभंगवाणी ।।



पवित्र सोंवळीं ।
एक तीं च भूमंडळीं ॥१॥
ज्यांचा आवडता देव ।
अखंडित प्रेमभाव ॥धृ.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गणेशोत्सव करमुक्त झाला!

## निर्बंधमुक्त होऊन 'डिजे' वाजणार ? मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

।नाशिक ।महाईन्यूज।

सणउत्सव निर्बंधमुक्त, करमुक्त करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्यानंतर त्याच्या अंमलबजावणी नाशिक महानगरपालिकेने केली आहे. त्यानुसार गणेशोत्सव मंडळांना आकारण्यात येणारी सर्व कर माफ करण्यात आली आहेत. तसेच भरलेल्या करांचा परतावाही केला जाणार असल्याच सांगण्यात आल आहे. शनिवारी (दी.२०) झालेल्या आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडलेल्या बैठकीत ठराव करून शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव करीता महानगरपालिकेच्या जागेवर तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात येणारे मंडप, स्टेज, कमान इत्यादिंचे परवाना कर चालू आर्थिक वर्षाकरीता (२०२२) माफ करण्याचा निर्णय घेतला आहे.



त्याचसोबत मूर्तिकारांनाही दिलासा देताना त्यांच्या मंडपांना लागू असलेला करही माफ करण्यात आले आहे. गेली दोन वर्षे गणेशोत्सवावरही कोरोनाचे सावट होते. त्यामुळे गणेशोत्सवावरही अनेक निर्बंध घालण्यात आले होते. मूर्तीची उंची, कार्यकर्त्यांची संख्या, भाविकांवरील बंधन इत्यादी कारणांनी दोन वर्षे गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यात आला होता. यंदा मात्र कोणत्याही निर्बंधांशिवाय गणेशोत्सव साजरा होणार असल्याने मंडळांचे कार्यकर्ते भाविक सगळ्यांमध्येच आनंदच वातावरण आहे. दरम्यान, सार्वजनिक मंडळांना परवानगी देण्याची प्रक्रिया पालिका प्रशासनाने सुरू केली. परवानग्यांसाठी एक खिडकी योजना सुरू करण्यात आल्याच महापालिकेच्या वतीने सांगण्यात आल आहे.

बैठकीत झाली होती मागणी

दोनच दिवसापूर्वी नाशिक पोलिस आयुक्त जयंत नाईकनवरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या पोलिस, महापालिका, महावितरण, जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासन, परिवहन आणि गणेशोत्सव मंडळ याच्या संयुक्त बैठकीत मागील दोन वर्षाचे निर्बंध, त्याच सोबत जाहिरातींचा कमी झालेला कल, निधीचे आटलेले स्त्रोत यामुळे मंडळांची झालेली आर्थिक कुचंबणा लक्षात घेऊन महानगरपालिकेचे कर माफ करावे अशी मागणी पुढे आली होती. आणि त्याच अनुषंगाने आता पालिका प्रशासनाने घेतलेल्या करमुक्तीच्या निर्णयाच मंडळांनी स्वागत केल आहे.

### डिजे वाजणार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केल्याप्रमाणे महानगर पालिका आयुक्तांनी गणेशोत्सव करमुक्त केला आहे. आता पोलिस आयुक्त निर्बंधमुक्त करण्याच्या दृष्टीकोणातून निर्णय घेत डिजेला परवानगी देणार का याकडे आता गणेशभक्तांचे आणि गणेशोत्सव मंडळांचे लक्ष लागले आहे. शुक्रवारी (दी.१९) झालेल्या दहीहंडी सोहळ्याच्या निमित्ताने मुंबई, पुणे, ठाणे या शहरात मोठ्या प्रमाणात डिजेचा दणदणाट बघायला मिळाला. खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं मंडळ असलेल्या ठाण्यातील टेंभी नाका येथेही डिजेच्या आवाजात दहीहंडी उत्सव मोठ्या दिमाखात पार पडला. त्यामुळे मागील काही वर्षात झालेली नाशिककर डिजे प्रेमींची उपेक्षा यंदा दूर होईल आणि डिजेला परवानगी मिळेल अशी आशा गणेशभक्त व मंडळांना लागली आहे. दरम्यान, बुधवारी (दी.१७) झालेल्या बैठकीत पोलिस आयुक्त नाईकनवरे यांनीही 'वरिष्ठ स्तरावरून आदेश आल्यास विचार करू' असे सांगत सकारात्मक्ता दर्शवली होती.

### शॉर्ट न्यूज

#### मनसेची रणनीती ठरणार?



। मुंबई ।।महाईन्यूज।

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे २२ ऑगस्ट रोजी पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. तर २३ ऑगस्ट रोजी पदाधिकाऱ्यांचा मेळावा होणार आहे. राज ठाकरे यांची शस्त्रक्रिया झाल्यानंतर ते पहिल्यांदाच पदाधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत. त्यामुळे या मेळाव्यात येत्या निवडणुकांची रणनीती ठरतेय का हे पाहावं लागणार आहे.

लीलावती रुग्णालयात राज ठाकरे यांच्यावर २० जून रोजी हिप बोनची शस्त्रक्रिया झाली होती. तेव्हापासून ते विश्रांती घेत होते. मात्र, आता पुन्हा एकदा ते ॲक्टिव्ह मोडवर आले आहेत. त्यानुसार, मुंबईत २२ ऑगस्टला प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक होणार. तर, २३ तारखेला कार्यकर्त्यांसाठी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान, २२ ऑगस्ट रोजी बैठक संपल्यानंतर राज ठाकरे पत्रकार परिषद घेणार आहेत. या पत्रकार परिषदेत ते कोणती राजकीय भूमिका जाहीर करतील याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

---

# आता मोदी नव्हे, बाळासाहेबांच्या नावाचा आधार

## उद्धव ठाकरेंची बोचरी टीका



।मुंबई ।महाईन्यूज।

देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत भाषण करताना आपल्याला बाळासाहेबांच्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी मुंबई महानगर पालिकेत सत्ता मिळवायची आहे, असे आवाहन केले होते. यावर शिवसेना पक्ष प्रमुखे उद्धव ठाकरे यांनी टीका केली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी बाळासाहेबांच्या नावाने मते मागणे म्हणजे मोदी पर्व संपत आल्याची नांदी असल्याची बोचरी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

### उद्धव ठाकरेंची टीका

देवेंद्र फडणवीस यांनी बाळासाहेबांच्या नावाने मतं मागणे ही मोदी पर्व संपल्याचीच ही नांदी आणि कबुली आहे. भाजपच्या धोरणानुसार वापर संपला की नवी नाव शोधायचे आणि त्या नावाने मते मागयची आणि आपली सत्तेची तळी भरायची असाच हा प्रकार आहे. या निमित्ताने भाजपचा खरा चेहरा देवेंद्र फडणवीसांनी समोर आणला. महाराष्ट्रातील जनता यांना मतपेटीतून उत्तर देईल, अशी टीका शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरेंनी केली.याबाबत प्रसिद्धी पत्रक काढण्यात आले आहे.

### पुढचा महापौर भाजप-सेनेचा

आज देवेंद्र फडणवीसांनी मुंबईतील भाजप कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मुंबईचे नवनिर्वाचित अध्यक्ष आशिष शेलारांचा सत्कार केला. पुढील निवडणुकीत मुंबईत भाजप आणि शिवसनेच्या युतीचा महापौर असेल, असे वक्तव्य त्यांनी यावेळी केले. भाजप ही एक टीम आहे. नेत्यांनी भाषणात माझा उल्लेख अमिताभ बच्चन असा केला, पण माझे शरीर अमजद खान सारखे आहे, असे फडणवीस म्हणाले.

# ...मी त्यांचा मुखवटा फाडायला आलोय

## आदित्य ठाकरेंची शिंदे गटावर टीका

।जळगाव ।महाईन्यूज।

काल आपले बॅनर कोणी तरी फाडले होते, अश्या चिंदी चोरांकडे लक्ष देऊ नका . मी आज त्यांचा मुखवटा फाडायला आलोय. असे म्हणत शिव संवाद यात्रेसाठी जळगावात लावण्यात आलेले आदित्य ठाकरे यांचे बॅनर फडणाऱ्या नतद्रष्टांवर आदित्य ठाकरे यांनी निशाण साधला .

राज्यात सुरू असलेलं घाणेरडे राजकारण तुम्हाला मान्य आहे का ? तुमच्या आमदारांची गद्दारी केली ते तुम्हाला मान्य आहे का? हेच तुम्हाला विचारायला आलोय, सांगायला आलोय. असे म्हणत शिवसेना नेते युवासेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांनी जळगावात शिवसैनिक आणि नागरिकांना संबोधित



केले. आदित्य ठाकरेंच्या शिव संवाद यात्रेचा चौथा टप्पा सुरू आहे . यावेळी बोलताना 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या सुपुत्राचे सरकार पाडून गुवाहाटीला जिथे ओला दुष्काळ होता, तिथे तुम्ही मजा मारत होता . ४० जण गद्दारी करून गेले, ते स्वतःसाठी गेले, जनतेसाठी नाही . ५० थर लावले बोलतायात , ५० थर नाही ५० खोके लावलेत तुम्ही, एवढे खोके म्हणतात पण लोकांमध्ये ते आले का? नवीन काही घडलंय का ? जनतेसाठी काही आलंय का? गेलेल्यांना काय मिळाले ? उलट आधी चांगली खाती तरी होती. तुमच्या माथ्यावर गद्दारीच कलंक कायम राहणार. महाराष्ट्रातील जनता तुम्हाला कधीही माफ करणार नाही.' असा घणाघात आदित्य ठाकरे यांनी केला .

# हिमाचल प्रदेशमध्ये पावसाचे थैमान!

## पावसामुळे या भागातील यंत्रणा पूर्णपणे विस्कळीत, अनेक ठिकाणी रस्त्याचे नदीमध्ये रुपांतर

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**हिमाचल प्रदेश तसेच उत्तराखंडमध्ये पावसाने थैमान घातले आहे. पावसामुळे या भागातील यंत्रणा पूर्णपणे विस्कळीत झाली असून अनेक ठिकाणी रस्त्याचे नदीमध्ये रुपांतर झाले आहे. अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटनादेखीस घडल्या आहेत. मुसळधार पवासामुळे येथे पुरस्थिती निर्माण झाली आसून या संकटामुळे आतापर्यंत २१ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तर सहा जण बेपत्ता असून बचाव पथकाच्या माध्यमातून त्यांचा शोध घेतला जात आहे. मागील २४ तासांपासून येथे मुसळधार पाऊस सुरू आहे.**

राज्य आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार येथील बहुतांश जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस असून येथे ३४ ठिकाणी भूस्खलन तसेच पुरस्थिती निर्माण झाली



आहे. पंजाब-हिमाचाल प्रदेश सीमेजवळ कांग्रा जिल्ह्यात असलेला एक रेल्वे रुळदेखील कोसळला आहे. मुसळधार पावसामुळे येथे नदीला पूर आला होता. याच कारणामुळे हा पूल कोसळला आहे. चंबा येथील बनेट गावातही भूस्खलन झाल्यामुळे येथे तीन जणांचा मृत्यू झाला. यातील दोघांचा मृतदेह हाती लागला असून दिसऱ्या मृतदेहाचा शोध सुरू आहे.



### उत्तराखंडमध्ये ढगफूटी

हिमाचल प्रदेशातील कांगडा, चंबा, बिलासपूर, सिरमौर आणि मंडी या पाच जिल्ह्यांमध्ये पुढील काही तासांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कुल्लूमध्येही मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती असून येथील सर्व शाळाही बंद करण्यात आल्या आहेत. याशिवाय उत्तराखंडमध्ये सकाळी झालेल्या ढगफुटीमुळे पुराचा धोका वाढला आहे.

### आठवडाभर मध्यम ते मुसळधार पाऊस

सध्या हिमाचल प्रदेश राज्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. पुढील आठवडाभर अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. राज्यात काही ठिकाणी मुसळधार ते मध्यम पावसाची शक्यता आहे. तर दुसरीकडे भूस्खलन आणि पूरस्थितीमुळे मृत्यू झालेल्या नागरिकांप्रती मुख्यमंत्री जयमराम ठाकूर यांनी शोक व्यक्त केला असून जिल्हा प्रशासन, बचाव व पुनर्वसन विभागाला जलद गतीने मदत पोहोचवण्याचे निर्देश दिले आहेत.

### 232 कोटी रुपयांची मदत जाहीर

हिमचाल प्रदेशमधील सध्याची पुरस्थिती लक्षात घेऊन येथील राज्य प्रशासनाने शनिवारी तातडीची बैठक घेऊन २३२ कोटींचा आपत्कालीन निधी मंजूर केला आहे. सध्याच्या पुरस्थितीमुळे येथील एकूण ७४२ रस्ते बंद करण्यात आले आहेत.

# छोटय़ा शहरांतील मोठय़ा करचोरीला चाप

**।नवी दिल्ली । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

मोठय़ा रकमेचे रोखीने व्यवहार करणाऱ्यांवर प्राप्तिकर विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. मोठी रुग्णालये, मंगल कार्यालये, मॉलमधील मोठी खरेदी, आलिशान वाहन- घरांची खरेदी किंवा रोखीने मोठे उत्पन्न मिळविणाऱ्या व्यावसायिकांवर प्राप्तिकर विभागाची करडी नजर आहे. प्राप्तिकर विभागाने आता आपल्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल केला असून भूतकाळातील करांसाठी तगादा लावण्यापेक्षा अशा मोठय़ा व्यवहारांवर नजर ठेवून वसुली करण्याची योजना आखली आहे. गेल्याच आठवडय़ात अलवर, कोटा आणि जालना यांसारख्या लहान शहरांमधील प्राप्तिकर विभागाच्या



छापेमारीत मोठय़ा प्रमाणात रोख रक्कम आणि बेकायदेशीर संपत्ती मिळाली. जालना येथे स्टील उत्पादकांच्या मोठय़ा प्रमाणात रोख आणि दागिने जप्त करण्यात आले. रुग्णालयांच्या बाबतीत नियमाने कितीही बंधनकारक असले तरीही त्यांच्याकडून पॅन क्रमांक घेतला जात नाही. प्राप्तिकर विभाग यासाठी प्रयत्नशील आहे. मात्र रुग्णालयांकडून रोखीत बीजक देणाऱ्या रुग्णांची माहिती बेकादेशीररित्या इतर आरोग्य सेवा पुरवठादारांना कळविली जाते, त्या माहितीच्या माध्यमातून अशा रुग्णांचा शोध घेतला जातो.

# “मुनव्वर फारुखीचा हैदराबादमधील ‘शो’ उधळून लावणार”

## भाजपा नेत्याच्या धमकीनंतर कार्यक्रमस्थळी पोलीस बंदोबस्त

**।नवी दिल्ली । ।महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

केंद्रातील एनडीए सरकारमधल्या कार्यक्षम मंत्र्यांमध्ये रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरींचं नाव अग्रक्रमाने घेतलं जातं. गडकरींचा कामाचा वेग आणि त्यांची प्रशासनावरची पकड या गोष्टींची नेहमीच राजकीय वर्तुळात चर्चा होत असते. गडकरींच्या कार्यक्षमतेचे अनेक दाखले देतानाच अनेकदा त्यांच्याकडे पंतप्रधानपदाचा सक्षम पर्याय म्हणूनही पाहिलं जातं. त्यामुळे अशा कार्यक्षम मंत्र्याचा सरकारमध्ये बोलबाला असणं ही फार साहजिक बाब मानली जाते. मात्र, भाजपानं नुकत्याच जाहीर केलेल्या पक्षाच्या संसदीय बोर्डामधून चक्क नितीन गडकरींना वगळण्यात आलं आहे. हे पाहून अनेक राजकीय विश्लेषकांच्या



भुवया उंचावल्या आहेत. यासंदर्भात आता काँग्रेसनं खोचक शब्दांत भाजपावर टीका करत नितीन गडकरींना वगळण्यावरून प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.

बुधवारी भाजपाकडून पक्षाच्या संसदीय मंडळाची यादी जाहीर करण्यात आली. या यादीमधून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि ज्येष्ठ नेते शिवराज सिंह चौहान यांना वगळण्यात आल्याचं दिसून आलं. या यादीमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, राजनाथ सिंह, अमित शाह, बी. एस. येडियुरप्पा, सर्बानंद सोनोवाल, के. लक्ष्मण,. इकबालसिंह लालपुरा, सुधा यादव, सत्यनारायण जटिया आणि बी. एल. संतोष यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे गडकरी आणि चौहान यांना वगळून त्यांच्याजागी नव्या मंडळात येडियुरप्पा आणि सरबानंद सोनोवाल यांना संधी देण्यात आली आहे. तेलंगणा राज्याचे भाजपा प्रमुख बंदी संजय कुमार यांनी मुनव्वर फारुखीचा शो बायकॉट करण्याचं आवाहन केलं आहे. “मुनव्वर फारुखीने हिंदू देवी-देवतांचा अवमान केला आहे. सीता ही आपली आराध्य दैवत आहे. पाणी, हवा, अग्नी आणि जमीन अशा सर्व ठिकाणी सीतेचं अस्तित्व आहे. पण टीआरएसच्या काही कार्यकर्त्यांनी राम आणि सीतेचा अवमान करणाऱ्या फारुखीला प्रमुख अतिथी म्हणून बोलावलं आहे. त्यामुळे आपण या कार्यक्रमाचा निषेध करायला हवा” असं आवाहन बंदी संजय कुमार यांनी केलं आहे.

# दीपिका-रणवीरने अलिबागमध्ये खरेदी केली 22 कोटींचा आलिशान बंगला



रणवीर सिंह आणि दीपिका पादुकोण यांनी शुक्रवारी त्यांच्या अलिबागमधील नव्या घरामध्ये गृह प्रवेश केला. यासंबंधीत फोटो रणवीर आणि दीपिकाने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर केले आहेत. त्यांचे हे घर मुंबईपासून जवळपास 90 किमी लांब समुद्र किनाऱ्याजवळ स्थित आहे. रणवीर आणि दीपिकाने हे घर गेल्या वर्षी खरेदी केलं होतं.

मिळालेल्या माहितीनुसार, रणवीर आणि दीपिकाने या संपत्तीसाठी 22 कोटींचा खर्च केला आहे. याव्यतिरिक्त दोघांनीही संपत्तीच्या स्टॅम्प ड्युटीसाठी 1.32 कोटींचा खर्च केला आहे. ही संपत्ती अलिबाग जवळील मपगावमध्ये आहे जी, 9000 स्क्वेअर मीटरमध्ये पसरलेली आहे. मीडिया रिपोर्ट्सच्या मते, याआधी जुलै 2021 मध्ये दीपिकाने बंगळुरूमध्ये देखील एक महागड घर खरेदी केलं आहे.

मुंबईमध्ये देखील खरेदी केली 119 कोटींची संपत्ती

मागील काही दिवसांपूर्वी रणवीर सिंहने एक नवीन घर खरेदी केलं होतं. मात्र या अर्पाटमेंटचे अजून बांधकाम पूर्ण झालेलं नाही. त्यांनी ज्या अपार्टमेंटची बोलणी केली आहे, तिथून अरबी समुद्राचे सुंदर दृष्य पाहता येतं.रणवीर सिंहने हे घर 119 कोटींना खरेदी केलेलं आहे. इतकंच नव्हे तर ही अपार्टमेंट शाहरूख खानचा मन्नत आणि सलमान खानचा गॅलेक्सी बंगल्याच्या मध्यावर आहे.

या चित्रपटात दिसणार दीपिका

अभिनेत्री दीपिका पादुकोण सुद्धा लवकरच 'फायटर'च्या चित्रीकरणासाठी सुरूवात करणार आहे. 'फायटर' चित्रपटाला भारतातली पहिला ऍक्शन चित्रपट असल्याचे म्हणटले जात आहे. 'बँग बँग' आणि 'वॉर' नंतर ऋतिक रोशन आणि सिद्धार्थ आनंदचा हा तिसरा चित्रपट आहे.'फायटर' पुढच्या वर्षीच्या ऑक्टोंबर पर्यंत रिलीज होणार आहे.

# सौंदर्याचा मुद्दा येतो तेव्हा... श्रुती मराठे नेमकं काय म्हणाली?



अभिनेत्री श्रुती मराठे(ही लोकप्रिय अभिनेत्रींपैकी पैकी एक आहे. श्रुती मराठे नेहमीच तिचे वेगवेगळे फोटो सोशल मिडियावर शेअर करत असते. तिच्या सगळ्याच फोटोंमध्ये खूप सुंदर दिसते. श्रुतीने नुकतंच एक नवीन फोटोशूट केलं आहे. त्यात तिचं सौंदर्य अधिकच खुललं आहे. याच फोटोवर श्रुती मराठेने समर्पक कॅप्शन सुद्धा दिले आहे.

# "तेरी मेरी यारी ... आता 'पुन्हा दुनियादारी'"



संजय जाधव दिग्दर्शित 2013 साली प्रदर्शित झालेला दुनियादारी चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाने मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक विक्रम मोडत नवी ओळख निर्माण केली होती. या चित्रपटाची कथा, चित्रपटातील व्यक्तिरेखा त्यांचे टायलॉग, चित्रपटातील गाणी आजही तितकीच लोकप्रिय आहेत. या चित्रपटाने मराठी चित्रपटसृष्टीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. या चित्रपटामध्ये स्वप्नील जोशी, अंकुश चौधरी, सई ताम्हणकर, उर्मिला कोठारे यांनी जबरदस्त भूमिका साकारल्या होत्या. त्यांच्या अभिनयाचं आजही अनेकजण कौतुक करत असतात.

दरम्यान, या चित्रपटाचे दिग्दर्शक संजय जाधव यांनी 'दुनियादारी 2' प्रदर्शित करणार असल्याची घोषणा केली आहे. संजय जाधव यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून

# ' रज्जो' मालिकेत मुख्य भूमिका मिळवण्यामागे आलिया भट्ट कनेक्शन!

'स्टार प्लसचा आगामी टीव्ही शो 'रज्जो' प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे कारण आलिया भट्ट सारखी हुबेहूब दिसणारी कलाकार सेलेस्टी बैरागी यातून मालिकाविश्वात पदार्पण करत आहे. आसाममधील सेलेस्टी बैरागीने काही दिवसांपूर्वी गंगूबाई काठियावाडी मधील दृश्य रीक्रिएट करून 'हुबेहूब आलिया' बनून सोशल मीडियाचे लक्ष वेधून घेतले होते. स्टारप्लसच्या आगामी 'रज्जो'मध्ये मुख्य नायिका बनून सेलेस्टीने अभिनेत्री होण्याचे तिचे बालपणीचे स्वप्न पूर्ण केले आहे. आलिया भट्टची मोठी फॅन, सेलेस्टी ही आसाममधील सोशल मीडिया मॉडेल आहे जी इंग्रजी साहित्यात पदवी घेत आहे. आपल्या या भूमिकेबद्दल सेलेस्टी म्हणाली, "मी आलिया भट्टची खूप मोठी फॅन आहे आणि तिचे चित्रपट पाहणे मला आवडते. एक युवा म्हणून मी सोशल मीडिया, नवीन रील आणि कथांमधून स्वतःला अपडेट करत राहते. आणि काही महिन्यांपूर्वी, मी गंगूबाई काठियावाडीचा एक सीन रिक्रिएट केला आणि पोस्ट केला. निर्मात्यांनी ते पाहिले आणि मला ऑडिशनसाठी बोलावले आणि काही



मॉक शूटनंतर मला 'रज्जो'ची भूमिका मिळाली." 'रज्जो' 22 ऑगस्ट 2022 रोजी भारतीय प्रमाणित वेळेनुसार संध्याकाळी 7 वाजता स्टार प्लसवर लॉन्च होणार आहे.'रज्जो' हा एक नवीन शो आहे जो उत्तराखंडच्या पुरातून वाचलेल्या मुलीच्या प्रवासाची कहाणी सांगतो. तिची आई गमावणे आणि ॲथलीट बनण्याचे तिचे अपूर्ण स्वप्न कसे साकार होईल यावर हा शो प्रकाश टाकतो. शिवाय, आईचा विरोध असताना देखील ती तिची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी शहरात येते.



# मला काहीही फरक पडत नाही...; चित्रपटांच्या बहिष्कारावर तब्बूचं उत्तर

2022 मध्ये हिंदी चित्रपटांसाठी फारसं चांगलं नाही. काही मोजके चित्रपट सोडले तर अनेक दिग्गज कलाकारांचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर कमाई करण्यात अयशस्वी झाले आहेत. नुकत्याच काही दिवसांपूर्वी आमीर खान आणि करीना कपूरचा 'लाल सिंह चड्ढा' चित्रपट प्रदर्शित झाला आहे. परंतु चित्रपट प्रदर्शित होऊन पाच दिवस होऊनही या चित्रपटाने 50 कोटींची कमाई देखील केलेली पाहायला मिळत नाही. इतकंच नाही तर अक्षय कुमारच्या 'रक्षाबंधन' चित्रपटाने देखील अजून 35 कोटींची कमाई सुद्धा केलेली नाही.

मागील अनेक दिवसांपासून सोशल मीडियावर या चित्रपटांवर बहिष्कार टाकण्याची मागणी केली जात आहे. दरम्यान, याबाबत सध्या बॉलिवूडमधील अनेक दिग्गज मंडळी आपलं मत मांडत आहेत. अशातच आता अभिनेत्री तब्बूने देखील एका इंटरव्यूमध्ये याबाबत आपलं मत मांडलं आहे. नुकत्याच पार पडलेल्या एका इंटरव्यू दरम्यान, तब्बूला चित्रपटांवरील बहिष्काराबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी ती म्हणाली की, बॉक्स ऑफिसच्या कलेक्शनशी मला काहीही फरक पडत नाही. कारण चित्रपटांमध्ये तिचे पैसे लागलेले नसतात. तसेच ती म्हणाली की, चित्रपट फ्लॉप झाल्याने कोणचंही करिअर संपत नाही. परंतु जेव्हा चित्रपट चांगला चालतो तेव्हा तिला खूप आनंद होतो. मागील काही महिन्यांपूर्वी तब्बूचा भूल भुलैया २ मध्ये दिसून आली होती. या चित्रपटाने २०० कोटींची कमाई केली होती. तब्बूच्या करिअर मधील हा सर्वात हिट चित्रपट होता.

या चित्रपटांमध्ये दिसणार तब्बू

येत्या काळात तब्बू अजय देवगणसोबत 'भोला' आणि 'दृश्यम' चित्रपटांमध्ये दिसणार आहे. तसेच ती 'वीर दी वेडिंग'च्या सिक्वेलमध्ये दिसून येऊ शकते.

## शॉर्ट न्यूज »

### झुलनच्या निवृत्तीचा सामना लॉर्ड्सवर?



नवी दिल्ली । महाईन्यूज

भारताची अनुभवी वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामी आगामी इंग्लंड दौऱ्यातील २४ सप्टेंबरला होणाऱ्या तिसऱ्या आणि अखेरच्या एकदिवसीय सामन्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारण्याची शक्यता आहे. हा सामना ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर खेळवला जाणार आहे.

झुलनची महिला क्रिकेटमधील सर्वकालीन सर्वोत्तम खेळाडूंमध्ये गणना केली जाते. क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत मिळून झुलनच्या नावे सर्वाधिक ३५२ बळी आहेत. ३९ वर्षीय झुलनला जुलैमध्ये श्रीलंकेविरुद्ध झालेल्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघात स्थान मिळाले नव्हते. त्यातच भारतीय संघ व्यवस्थापनाचा युवा खेळाडूंना अधिकाधिक संधी देण्याचा प्रयत्न असल्याने झुलनच्या भवितव्याबाबत प्रश्न निर्माण झाले होते. परंतु इंग्लंडविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

### भारताला मालिकेत विजयी आघाडी

# दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात झिम्बाब्वेचा 5 गडी राखून पराभव

**तीन सामन्यांच्या मालिकेत भारताला 2-0 अशी विजयी आघाडी मिळाली आहे.**

। हरारे । महाईन्यूज ।



भारत आणि झिम्बाब्वेदरम्यान तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसरा सामना 'हरारे स्पोर्ट्स क्लब' क्रिकेट मैदानावर झाला. या सामन्यात भारताने यजमान संघावर पाच गडी राखून विजय मिळवला. या विजयामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत भारताला २-० अशी विजयी आघाडी मिळाली आहे.

पहिल्यांदा फलंदाजी करून यजमान संघाने ३८.१ षटकांमध्ये सर्वबाद १६१ धावा केल्या होत्या. झिम्बाब्वेने विजयासाठी दिलेले १६२ धावांचे लक्ष्य भारतीय संघाने पाच गडी गमावून २५.५ षटकांमध्ये पार केले. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाला पहिला धक्का कर्णधार केएल राहुलच्या रूपात बसला. तो केवळ एक धाव करून तंबूत परतला. विशेष म्हणेज आजच्या सामन्यात राहुल स्वत: सलामीला आला होता. मात्र, मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला. त्यानंतर शिखर धवन आणि शुबमन गिल यांनी दुसऱ्या गड्यासाठी २९ चेंडूत ४२ धावांची भागीदारी केली. पहिल्या एकदिवसीय सामन्याप्रमाणे या सामन्यातसुद्धा धवन-गिल जोडी भारतीय डावाचा शेवट करेल असे वाटत असताना धवन ३३ धावा करून धवन बाद झाला. त्यानंतर, ईशान किशन (६), शुबमन गिल (३३) आणि दीपक हुडा (२५) बाद झाले. यष्टीरक्षक संजू सॅमसन आणि अक्षर पटेल यांनी भारतीय डावाचा शेवट केला. भारताच्यावतीने संजू सॅमसनने सर्वाधिक ४३ धावा केल्या.

त्यापूर्वी, भारतीय कर्णधार केएल राहुलने नाणेफेक जिंकून झिम्बाब्वेला प्रथम फलंदाजीचे निमंत्रण दिले होते. प्रथम फलंदाजी करण्यासाठी उतरलेल्या झिम्बाब्वेची सुरुवात निराशाजनक झाली. संघाचा धावफलक ३१ धावांवर जाऊपर्यंत चार गडी बाद झाले होते. त्यानंतर शॉन विल्यम्सने ४२ धावांची खेळी करून संघाचा डाव काही प्रमाणात सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण, भारतीय गोलंदाजांच्या माऱ्यापुढे झिम्बाब्वेचा निभाव लागला नाही.



### वेस्टर्न अँड सदर्न टेनिस स्पर्धा :

# मेदवेदेव्हची उपांत्य फेरीत धडक

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

अग्रमानांकित डॅनिल मेदवेदेव्हने अमेरिकेच्या ११व्या मानांकित टेलर फ्रिट्झला सरळ सेटमध्ये पराभूत करत वेस्टर्न अँड सदर्न खुल्या टेनिस स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीतील लढतीत मेदवेदेव्हने फ्रिट्झवर ७-६ (७-१), ६-३ अशी मात केली. युक्रेनवर केलेल्या हल्ल्यामुळे रशियावर विम्बल्डन स्पर्धेत बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे २६ वर्षीय मेदवेदेव्हला विम्बल्डनमध्ये खेळता आले नाही. मात्र, आगामी अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत मेदवेदेव्हला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे.

वेस्टर्न अँड सदर्न स्पर्धेतील २०१९च्या विजेत्या मेदवेदेव्हचा पुढील फेरीत ग्रीसच्या सातव्या मानांकित स्टेफानोस त्सित्सिपासशी सामना होणार आहे. त्सित्सिपासने जॉन इस्नेरवर ७-६ (७-५), ५-७, ६-३ असा विजय साकारत आगेकूच केली. महिलांमध्ये बिगरमानांकित मॅडिसन कीजने विम्बल्डन विजेत्या एलिना रायबाकिनाला ६-२, ६-४ असे सरळ सेटमध्ये नमवत उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. कीजचा सामना दोन विम्बल्डन विजेत्या पेट्रा क्विटोव्हाशी होणार आहे. क्विटोव्हाने ऑस्ट्रेलियाच्या आयला टोमयानोव्हिचचा ६-२, ६-३ असा पराभव केला.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही